2 8 MAR 2023
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महेश बंडगरला राष्ट्रपती, सोहम जगतापला कुलपती सुवर्णपदक

## कुलगुरूंची घोषणा : संजय धांडे, चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : प्राणीशास्त्र अधिविभागातील द्वितीय वर्षाचा विद्यार्थी महेश माणिक बंडगर (मूळचा सावे, ता. सांगोला) याला राष्ट्रपती सुवर्णपदक आणि मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारा तरुण इस्लामपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचा सोहम तुकाराम जगताप (मूळ गाव किल्ले मच्छिंद्रगड) हे कुलपती सुवर्णपदकाचे मानकरी ठरले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत त्यांच्या नावांची घोषणा केली.


विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ बुधवारी (दि. २९ मार्च) केंद्रीय पद्धतीने होणार आहे. कानपूर भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे माजी संचालक पद्मश्री डॉ. संजय धांडे प्रमुख पाहुणे म्हणून आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होणार आहे.

समारंभात राष्ट्रपती आणि कुलपती सुवर्णपदकासह १८ स्नातकांना प्रत्यक्ष पदवी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यात पीएच.डी. प्राप्त ४६ स्नातकांचाही समावेश आहे. विद्यापीठ प्रांगणात १६,५९४ स्नातकांना आणि बाकी ४९,८६३ स्नातकांना टपालाने पदवी प्रमाणपत्र पाठविले जाणार आहे.

या पत्रकार परिषदेला प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.



सोहम जगताप



महेश बंडगर

### अशी आहे स्नातकांची संख्या

| | |
|---|---|
| ३०० पीएच.डी. | २७५५० विज्ञान व तंत्रज्ञान |
| २१,१५५ वाणिज्य व व्यवस्थापन | २२१३ इंटर डिसिप्लिनरी स्टडी |
| १५,५३९ मानव्यशास्त्र | ६६,४५७ एकूण |

### ग्रंथमहोत्सवात आज ग्रंथदिंडी

- दीक्षांत समारंभानिमित्त भरविण्यात येणाऱ्या ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते सकाळी १० वाजता होणार असून, तत्पूर्वी कुलगुरूंच्या उपस्थितीत ग्रंथ दिंडी कमला कॉलेज येथून सकाळी ७.३० वाजता निघणार आहे.
- कमला कॉलेज, सायबर चौकातून पालखी विद्यापीठात कार्यक्रमस्थळी येणार आहे. २९ मार्चला जागर दुर्मीळ वाद्यांचा आणि भावतरंग हा सांस्कृतिक कार्यक्रम दुपारी ३.३० वाजता सभामंडपाजवळ होणार आहे.

लोकमत

# उद्योजकता विकासवर आज कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विद्यापीठ-उद्योग कक्ष आणि कोल्हापूर फौंड्री इंजिनीअरिंग क्लस्टर, गोशिमा यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता विकास या विषयावर आज, मंगळवारी शाहू सभागृहामध्ये कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेत बी.एस. शिंपुकडे, भक्ती बद्रा, नवीन महाजन, विजय वसगडे, मंगेश पाटील, प्रताप पुराणिक सहभागी होणार आहेत. उद्घाटन कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांच्या हस्ते प्र.कुलगुरू डॉ.पी.एस. पाटील, वीरेंद्र पाटील, सचिन शिरगावकर यांच्या उपस्थितीत होणार आहे. अधिष्ठाता डॉ.एम.एस. देशमुख, कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे, विद्यापीठ-उद्योग कक्ष समन्वयक, प्रा.एस.डी. डेळेकर यांच्या उपस्थितीत कार्यशाळेची सांगता होणार आहे.

2 8 MAR 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा उद्या ५९ वा दीक्षांत समारंभ

## कुलगुरूंची माहिती : राज्यपाल रमेश बैस, प्रो. संजय धांडे यांची प्रमुख उपस्थिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ केंद्रीय पद्धतीने बुधवार, दि. २९ रोजी दुपारी १२ वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह येथे होणार आहे. समारंभाचे अध्यक्षस्थान राज्यपाल महेश बैस भूषविणार आहेत. भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) कानपूरचे माजी संचालक डॉ. संजय धांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित राहणार आहेत. यावर्षी ६६ हजार ४५७ पदव्या प्रदान केल्या जाणार आहेत. राष्ट्रपती सुवर्णपदक महेश बंडगर तर कुलपती सुवर्णपदक सोहम जगताप यांना जाहीर करण्यात आल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यंदाच्या दीक्षांत समारंभात पदवी प्राप्त विद्यार्थिनींची संख्या अधिक आहे. समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून १६ हजार ५९४ विद्यार्थी आणि अनुपस्थितीने (पोस्टाने) ४९ हजार ८६३ विद्यार्थी पदव्या घेणार आहेत. १६ विद्यार्थ्यांना पदवीप्रमाणपत्रे व पारितोषिके व ४६ जणांना पीएच.डी. पदवी प्रदान केली जाईल. पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या ३०० च्यावर आहे.

दीक्षांत समारंभाची ग्रंथदिंडी-पालखी मिरवणुकीने सुरुवात होणार आहे. दि. २८ मार्च रोजी सकाळी ७.३० वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडी व पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. दीक्षांत समारंभानिमित्त २८ ते २९ मार्च या कालावधीत १७ व्या ग्रंथ महोत्सवाचे आयोजन केले आहे. कुलगुरूंच्या हस्ते २८ रोजी सकाळी ११ वाजता ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होईल. भारतीय व परदेशी कंपनीचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डिजिटल ग्रंथ, डेटाबेस पॅकेज यांचे ४० स्टॉल असणार आहेत. दि. २९ रोजी दुपारी ३.३० संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे 'जागर दुर्मीळ वाद्यांचा व भावतरंग' हा कार्यक्रम होईल. पत्रकार परिषदेला प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

**दीक्षांत समारंभातील पदव्यांची विद्याशाखानिहाय संख्या...**

विज्ञान व तंत्रज्ञान - **२७ हजार ५५०**
वाणिज्य आणि व्यवस्थापन- **२१ हजार १५५**
मानव्यशास्त्र विद्याशाखा- **१५ हजार ३३९**
आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखा- **२ हजार २१३**

### प्रो. संजय धांडे यांचा परिचय...



प्रो. संजय धांडे आयआयटी कानपूरचे माजी संचालक आहेत. त्यांचा जन्म १४ फेब्रुवारी १९४८ रोजी झाला. पुणे येथून त्यांनी मॅकेनिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतली. आयआयटी कानपूरमधून पीएच.डी. पदवी मिळविली. उत्तम प्रशासक, संशोधक, नावीण्यपूर्ण तंत्रज्ञान संशोधक म्हणून त्यांची ख्याती आहे. त्यांनी प्रोटोटायपिंग, थ्री-डी प्रिंटिंग, रॅपिड टुलिंग या संगणकीय टेक्नॉलॉजीवर भर दिला. ऑटोप्ले ही नावीण्यपूर्ण कॅड टेक्नॉलॉजी त्यांनी आंतराळ विकास संस्थेसाठी विकसित केली. देशभरातील शासकीय व अशासकीय विज्ञान व तंत्रज्ञान संस्थांचे ते संस्थापक व संचालक आहेत. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार समिती, यूजीसी, ओएनजीसी या संस्थाचे सदस्य राहिले आहेत. त्यांना महाराष्ट्र, राज्यस्थान, मध्य प्रदेश येथील संस्थांनी पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. पाच संस्थांनी डॉक्टरेट पदवीने गौरविले आहे. त्यांचे १३५ संशोधन लेख प्रसिद्ध झाले आहेत. १२० विद्यार्थ्यांनी पीएच.डी.मिळविली आहे. सध्या ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्रोफेसर व एनआयटी मुंबई व दिल्लीचे चेअरमन आहेत.


2 8 MAR 2023 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरण रक्षण कामास प्राधान्य राहील

## राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता महेश बंडगर याची भावना

**कोल्हापूर :** सध्या पर्यावरण व निसर्गाचा ऱ्हास सुरू आहे. पर्यावरण व निसर्गासाठी काहीतरी करण्यासाठी भविष्यात वनअधिकारी व्हायचे स्वप्न असल्याची भावना शिवाजी विद्यापीठ राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता महेश बंडगर याने व्यक्त केली.

यावर्षीचे दीक्षांत समारंभाचे क्रीडा, बौद्धिक व कलाक्षेत्र, एनसीसी, एनएसएस यामधील गुणवत्ता तसेच व्यक्तिमत्त्व शारीरिक आरोग्य, भाषा शुद्धता, सर्वसाधारण ज्ञान व नेतृत्व या गुणात आदर्श ठरल्याने महेश बंडगर यास राष्ट्रपती सुवर्णपदक



जाहीर झाले आहे. महेश माणिक बंडगर सावे (ता. सांगोला, जि.सोलापूर) येथील आहे. सध्या शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागात एम.एस्सी. भाग-२ मध्ये शिकत आहे. वडील रेशन दुकानदार व आई गृहिणी आहे. त्याने एलबीएस कॉलेज सातारा येथून पदवी संपादन केली आहे. महेश राज्यस्तरावरील बॉक्सिंग खेळाडू तर वडील पैलवान आहेत.

जनसंपर्क कक्ष
28 MAR 2023
पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी भाषा संवर्धनासाठी योगदान देणार

## कुलपती सुवर्णपदक विजेता सोहम जगताप यांचा मानस

कोल्हापूर : घरातील वातावरण सांप्रदायिक असल्याने पहिल्यापासून मराठी भाषेचा ओढा कायम आहे. मराठी विषयात काहीतरी करून दाखविण्यासाठी व मराठी भाषा प्रचार व प्रसार आणि संवर्धनासाठी येथून पुढील काळात योगदान देणार असल्याचा मानस शिवाजी विद्यापीठ दीक्षांत समारंभ कुलपती सुवर्णपदक विजेता सोहम जगताप यांनी व्यक्त केला.

सोहम सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील किल्ले मच्छिंद्रगड येथील आहे. वडील शेतकरी असून, आई गृहिणी आहे. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतल्यानंतर एम.ए. मराठी विषयास प्रवेश घेऊन विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविला.



सध्या पाटण येथे खासगी कंपनीत कार्यरत आहे. सुवर्णपदकामुळे जबाबदारी वाढली आहे. प्राध्यापक बनून मराठी भाषा व संस्कृती सामान्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करेन.

28 MAR 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स' मध्ये विद्यापीठाचे ९२ संशोधक

## कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्यासह प्राध्यापकांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक पातळीवरील संशोधकांची क्रमवारी 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२३' नुकतीच जाहीर झाली. जागतिक संशोधकांच्या अद्ययावत क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह ९२ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश झाला आहे.

अमेरिकेतील मिशीगन विद्यापीठामार्फत हा निर्देशांक २०२१ पासून दरवर्षी जाहीर करण्यात येतो. प्रा. मुरत आल्पर आणि प्रा. सिहान डॉजर यांनी संयुक्तपणे 'आल्पर-डॉजर सायंटिफीक इंडेक्स' तथा 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स' विश्लेषित केला आहे. गुगल स्कॉलरवरील


डॉ. डी. टी. शिर्के


डॉ. पी. एस. पाटील

संशोधकांचा गेल्या पाच वर्षांतील एच-इंडेक्स, आय-टेन इंडेक्स हे निर्देशांक व सायटेशन स्कोअर (उद्धरणे) या बाबींचे पृथःक्करण केले. जगभरातल्या २१ हजार ४३९ शैक्षणिक संस्थांमधील १३ लाख ४५ हजार १८६ संशोधकांचा डाटा त्यांनी संकलित केला. त्यातून 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२३' जाहीर करण्यात आले आहे. पहिल्या वर्षीपासून शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी यादीत स्थान प्राप्त केले आहे. २०२१ मध्ये ४८, २०२२ मध्ये ८० तर यावर्षी २०२३ मध्ये ९२ अशा चढत्या क्रमाने विद्यापीठातील संशोधकांची यादीतील संख्या वाढली आहे. यावर्षीच्या यादीचे वैशिष्ट्य म्हणजे यंदा कला, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांकडील ८ संशोधकांना स्थान प्राप्त झाले आहे. डॉ. एस. पी. गोविंदवार, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. आण्णासाहेब मोहोळकर, डॉ. ज्योती जाधव, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. संजय कोळेकर, डॉ. अनिल घुले, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. एन. आर. तरवाळ, डॉ. गोविंद बी. कोळेकर, डॉ. तुकाराम डी. डोंगळे, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. एस. आर. सावंत, डॉ. विजय पुरी, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. प्रमोद वासंबेकर यांच्यासह ९२ संशोधक प्राध्यापकांचा समावेश यादीत आहे.

**कोल्हापूरसाठी अभिमानाची बाब**

आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रमवारीत 'अ++'मानांकित शिवाजी विद्यापीठाच्या ९२ संशोधकांचा समावेश होणे कोल्हापूरसाठी अभिमानाची बाब आहे. संशोधकांत स्थान मिळविणारे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक ठरले आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मटेरियल सायन्स, सौरघट, इलेक्ट्रोमॅग्नेटिझम, गॅस सेन्सर आणि नॅनोविज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान कायम राखले आहे.

> शिवाजी विद्यापीठात विविध विषयांत अखंडित संशोधन सुरू असून त्याचे फलित आहे. 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स' मध्ये संशोधकांची संख्या वर्षागणिक वाढते आहे, ही समाधानाची बाब आहे. विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतील संशोधकांचे हे कार्य अभिनंदनीय आहे. यंदा प्रथमच सामाजिक विज्ञान, भाषा या विषयांतील शिक्षकांचा समावेश झाला आहे. यापुढील काळात विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालये संशोधनकार्य जोमाने करत राहतील.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज 'उद्योजकता विकास'वर कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विद्यापीठ-उद्योग कक्ष व कोल्हापूर फौंड्री इंजिनिअरिंग क्लस्टर, गोशिमा यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता विकास या विषयावर दि. २८ रोजी कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळेचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, वीरेंद्र पाटील, सचिन शिरगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. कार्यशाळेतून विद्यार्थी, संशोधक, शिक्षक यांच्यामध्ये उद्योजकतेबाबत जागृती व्हावी व त्यासाठी आवश्यक उद्योजक कौशल्ये, उद्योगामध्ये नवनवीन संधी आणि बदल, उद्योग उभारण्यासाठी आवश्यक शासकीय पाठबळ, स्टार्टअप्स, अशा विविध विषयांवर व्याख्याने होणार आहेत. कार्यशाळेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन विद्यापीठ-उद्योग कक्ष समन्वयक, प्रा. एस. डी. डेळेकर यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# ग्रंथदिंडीसह ग्रंथ प्रदर्शनाने दीक्षांत समारंभाचे दालन आजपासून खुले

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभाचे दालन मंगळवार, दि. २८ मार्चपासून ग्रंथदिंडी व ग्रंथ प्रदर्शनाने खुले होणार आहे. यंदा ग्रंथ महोत्सवाचे १७ वर्ष असून, २८ व २९ मार्च या दोन दिवशी विद्यापीठाच्या प्रांगणात पुस्तकांचा मेळा भरणार आहे, अशी माहिती ग्रंथ महोत्सवाचे समन्वयक डॉ. डी. बी. सुतार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दीक्षांत समारंभानिमित्ताने २८ मार्च रोजी सकाळी साडेसात वाजता राजारामपुरीतील कमला कॉलेजपासून ग्रंथदिंडीला सुरुवात होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या दिंडीचे उद्घाटन होणार आहे. सकाळी दहा वाजता विद्यापीठ प्रांगणात ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. या महोत्सवात ५५ स्टॉल्स मांडण्यात येणार आहेत. यामध्ये पुस्तकांसह तृणधान्य वर्षानिमित्त खाद्यपदार्थांचे स्टॉल असतीलदि. २९ मार्चपर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत ग्रंथ महोत्सव सुरू राहणार आहे. २९ मार्च रोजी दुपारी चार वाजता जागर दुर्मीळ वाद्यांचा व भावतरंग हे कार्यक्रम सादर होणार आहेत.

28 MAR 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा उद्या दीक्षांत समारंभ

## पद्मश्री डॉ. संजय धांडे प्रमुख उपस्थित, ६६ हजार ४५७ स्नातक घेणार पदवी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



**पदवीदान सोहळ्याची खास वैशिष्ट्ये**

- विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार यंदा केंद्रीय पद्धतीने दीक्षांत समारंभ
- दीक्षांत समारंभासाठी विद्यार्थ्यांकडून संपूर्ण ऑनलाईन पद्धतीने अर्ज प्रक्रिया
- अनुपस्थित स्नातकांची पदवी प्रमाणपत्रे तातडीने पोस्टाने पाठवणार
- नावात चूक झाल्यास ऑनलाईन सोडवणूक होणार

शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ बुधवारी २९ मार्च रोजी होणार आहे. आयआयटीचे माजी संचालक डॉ. संजय धांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत, तर महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ प्रांगणातील जिजाऊ सभागृहात दुपारी १२ वाजता या सोहळ्याला सुरुवात होणार आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित राहणार आहेत. यंदा विविध विद्याशाखेतील ६६ हजार ४५७ स्नातक पदवी घेणार असून, ४६ स्नातकांना पीएच.डी. पदवी प्रदान केली जाणार आहे. यंदाच्या राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी महेश माणिक बंडगर, तर कुलपती सुवर्णपदकाचा मानकरी सोहम तुकाराम जगताप ठरला आहे. २८ मार्चपासून ग्रंथ दिंडी व ग्रंथ प्रदर्शनाने दीक्षांत सोहळ्याला प्रारंभ होणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

१६ फेब्रुवारी रोजी हा सोहळा होणार होता; मात्र तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी राजीनामा दिल्याने या सोहळा स्थगित करण्यात आला होता. दरम्यान, २९ मार्च रोजी होणाऱ्या दीक्षांत सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

कोरोना काळानंतर पुन्हा एकदा विद्यापीठाच्या प्रांगणात यंदा केंद्रीय पद्धतीने दीक्षांत सोहळा होणार आहे. यंदा दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १६,५९४ आहे, तर पोस्टाने ४९,८६३ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र पाठवण्यात येणार आहेत. विविध क्षेत्रातील १६ विद्यार्थी पारितोषिक स्वीकारणार आहेत. या वर्षी संशोधक विद्यार्थ्यांचा टक्का वाढला असून, सर्वाधिक ३०० विद्यार्थी पीएच.डी. पदवीने गौरवण्यात येणार आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान या विभागातील पदवीधारक विद्यार्थ्यांची संख्या जास्त असून, या वर्षी या विभागातील २७,५५० विद्यार्थी पदवीधर झाले आहेत. कॉमर्स आणि व्यवस्थापन विभागातील २१,१५५ विद्यार्थ्यांना पदवी देण्यात येणार आहे. सामाजिक शास्त्र विभागातील १५,५३९ विद्यार्थ्यांना पदवीदान केली जाणार असून, इतर विद्याशाखेतील २२१३ विद्यार्थ्यांना पदवी मिळणार आहे. या वर्षी पदवी घेणाऱ्या एकूण स्नातकांमध्ये मुलींची संख्या मुलांपेक्षा एका टक्क्याने जास्त आहे.

पत्रकार परिषदेस प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह पदाधिकारी, विभागप्रमुख उपस्थित होते.

28 MAR 2023 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हे विद्यार्थी ठरले सुवर्णपदकाचे मानकरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



प्राणिशास्त्रचा महेश बंडगर ठरला राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी दीक्षांत समारंभात उत्सुकता असते ती शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रपती सुवर्णपदकावर नाव कोण कोरणार याची. यंदा हा मान प्राणिशास्त्र विभागातील महेश माणिक बंडगर या विद्यार्थ्याने मिळवला. २०२१ ते २०२२ या शैक्षणिक वर्षात क्रीडा, बौद्धिक , कला, एनसीसी, एनएसएस, व्यक्तिमत्त्व, शारीरिक आरोग्य, भाषा शुद्धता, सर्वसामान्य ज्ञान, वर्तणूक व नेतृत्व यामध्ये आदर्श ठरलेल्या महेश बंडगर याला राष्ट्रपती सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे. अतिशय सामान्य कुटुंबातील महेशने त्याच्यातील शैक्षणिक गुणांवर या पदकापर्यंत बाजी मारली आहे. महेश मूळचा सोलापूर जिल्ह्यातील सांगोला गावचा आहे. त्याच्या वडिलांचे निधन झाले असून, ते गावात रेशन दुकान चालवत होते, तर आई गृहिणी आहे. वडिलांकडून कुस्तीची आवड त्याच्यात निर्माण झाली असून, तो बॉक्सिंग, कुस्ती, ज्यूदो या खेळांमध्ये राष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे. प्राणिशास्त्र या विषयात त्याने संशोधन प्रकल्प सादर केले असून, अनेक चर्चासत्रांत त्याने पेपर वाचन केले आहे. एनएसएसमधील बेस्ट कॅडेट म्हणून महेशची निवड झाली आहे, तसेच तो आव्हान कॅम्पचा सदस्य आहे. मानवी वस्तीत शिरणाऱ्या वन्यप्राण्यांची मानसिकता या विषयावर वाईल्ड लाईफ चळवळीत महेशचा सहभाग आहे. भविष्यात त्याला वन विभागात अधिकारी व्हायचे असून, पर्यावरणाचा ऱ्हास आणि वन विभागाची जबाबदारी हे त्याचे ध्येय आहे.

**इंजिनिअरिंगकडून भाषेकडे वळलेल्या सोहम जगतापची कुलपती सुवर्णपदकावर मोहोर**

शिवाजी विद्यापीठातर्फे यंदा कुलपती सुवर्णपदकावर इस्लामपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील सोहम तुकाराम जगतापने मोहोर उमटवली आहे. ज्या दिवशी विद्यापीठाच्या कला शाखेत त्याने प्रवेश घेतला, तेव्हाच त्याने हे सुवर्णपदक मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे ध्येय बाळगले होते. खरे तर सोहमने इंजिनिअरिंगची पदवी घेतली असून, तो एका खासगी कंपनीत नोकरीही करतो; पण भाषेची आवड त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. यातूनच त्याने कला शाखेत प्रवेश घेतला. मार्च २०२२ या वर्षात विद्यापीठाच्या सर्व भाषा विभागांत प्रथम क्रमांकाने सोहम उत्तीर्ण झाला आहे.

2 8 MAR 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय इंडेक्समध्ये विद्यापीठाचे ९२ संशोधक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जागतिक पातळीवरील संशोधकांची क्रमवारी 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२३' नुकतीच जाहीर झाली. या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह ९२ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश आहे.

अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठामार्फत हा निर्देशांक २०२१ पासून दरवर्षी जाहीर करण्यात येतो. यामध्ये पहिल्या वर्षीपासून शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी स्थान मिळवले आहे. २०२१ मध्ये ४८, २०२२ मध्ये ८० आणि आता २०२३ मध्ये ९२ अशा चढत्या क्रमाने विद्यापीठातील संशोधकांची संख्या वाढत राहिली आहे. या वर्षी कला, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे या विद्याशाखांकडील ८ संशोधकांना स्थान प्राप्त झाले आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक ठरले आहेत. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मटेरियल सायन्स, सौरघट, इलेक्ट्रो मॅग्नेटिझम, गॅस सेन्सर आणि नॅनोविज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान कायम राखले आहे.


अमेरिकेच्या मिशिगन विद्यापीठातील प्रा. मुरत आल्पर आणि प्रा. सिहान डॉजर या दोघांनी संयुक्तपणे 'आल्पर-डॉजर सायंटिफिक इंडेक्स' तथा 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स' विश्लेषित केलेला आहे. त्यासाठी त्यांनी गुगल स्कॉलरवरील संशोधकांचा गेल्या पाच वर्षांतील एच-इंडेक्स, आय-टेन इंडेक्स हे निर्देशांक तसेच सायटेशन स्कोअर (उद्धरणे) इत्यादी बाबींचे पृथक्करण केले.

जगभरातल्या २१,४३९ शैक्षणिक संस्थांमधील १३,४५,१८६ संशोधकांचा डाटा त्यांनी संकलित केला. कृषी व वने, कला व स्थापत्य, वाणिज्य व व्यवस्थापन, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, इतिहास, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, कायदे अभ्यास, वैद्यकीय व आरोग्य विज्ञान, नैसर्गिक शास्त्रे व सामाजिक शास्त्रे यासह अन्य २५६ उपशाखांमधील संशोधकांचा समावेश या मानांकनामध्ये केला आहे. त्यातून 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२३' जाहीर केले आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या रासेयो कक्ष संचालकपदी डॉ. टी. एम. चौगले

**मुरगूड : प्रतिनिधी**



भोगावती महाविद्यालय कुरुकलीच्या प्राणीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. तानाजी महादेव चौगले (मुरगूड) यांची शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या संचालकपदी निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी तीन वर्षांच्या कालावधीसाठी ही जबाबदारी डॉ. चौगले यांच्याकडे सोपवली आहे. प्रा. डॉ. चौगले यांच्या निवडीने प्रथमच मुरगूडचा सन्मान विद्यापीठ पातळीवर झाला आहे. अध्यापनाचा २३ वर्षे अनुभव असणाऱ्या डॉ. चौगले यांची शैक्षणिक व संशोधनात्मक गुणवत्ता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक शोधनिबंधातून सिद्ध झाली आहे. विद्यापीठ पातळीवर त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली असून, शेकडो व्याख्यानातून त्यांनी समाजप्रबोधनाचे काम केले आहे.

2 8 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आवड, इच्छाशक्तीला दिली कष्टाची जोड

## दोन्ही पदकांवर मुलांचा ठसा; सर्वसामान्य कुटुंबाची पार्श्वभूमी

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : आवड, इच्छाशक्तीला कष्टाची जोड दिल्यानंतर निश्चितपणे यशाला गवसणी घालता येते, हे राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता महेश बंडगर आणि कुलपती सुवर्णपदक विजेता सोहम जगताप यांनी दाखवून दिले आहे. यंदाच्या दीक्षान्त समारंभात या दोन्ही पदकांवर 'मुलांनी ठसा उमटविला आहे.

राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मानकरी ठरलेला महेश सध्या विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागात एम. एस्सी. अभ्यासक्रमाच्या द्वीतीय वर्षात शिकत आहे. सर्वसामान्य कुटुंबांतील महेश याला तीन बहीण आणि एक भाऊ, आई आहे. रेशन दुकान चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह वडील करत होते. ते पैलवान होते. त्यांच्याकडून कुस्तीचा वारसा महेश याने घेतला. ज्यूदो, बॉक्सिंगमध्ये त्याने राष्ट्रीयपातळीवरील स्पर्धा गाजविल्या. दहावीत असताना वडीलांचे छत्र हरपले. आई मायाबाई, भाऊ मंगेश आणि मोठी बहीण प्रतीक्षा यांच्या पाठबळावर महेशने शिक्षण सुरू ठेवले. सातारा येथील एलबीएस कॉलेजमधून पदवीचे शिक्षण पूर्ण केले.



महेश बंडगर



सोहम जगताप

हॉस्पिटलमध्ये पार्टटाईम काम करत त्याने शिक्षणाचा खर्च भागविला. पुढे एम. एस्सीसाठी विद्यापीठात प्रवेश घेतला. शिक्षणासह अन्य उपक्रमातही सक्रिय राहिला. एनएसएसचा बेस्ट कॅडेट तो ठरला. पाली आणि विंचू यांच्याबाबत त्याचे संशोधन सुरू आहे. वाईल्डलाईफ चळवळीतही तो कार्यरत आहे.

कुलपती सुवर्णपदकाचा मानकरी ठरलेला सोहम सध्या इलेक्ट्रिक इंजिनिअर म्हणून कार्यरत आहे. वारकरी सांप्रदायातील कुटुंब असल्याने त्याला लहानपणापासून भाषेची आवड लागली. मात्र, त्याने

> कुटुंबीय, शिक्षकांच्या पाठबळावरच आजपर्यंत यशस्वी वाटचाल झाली. राष्ट्रपती सुवर्णपदक मिळाल्याचा खूप आनंद होत आहे. पुढे वनविभागात उच्चपदस्थ अधिकारी म्हणून काम करायचे आहे.
>
> **-महेश बंडगर**

> भाषेबद्दलची आवड मला स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळेच इंजिनिअरिंगनंतरही एम. ए. अभ्यासक्रमाल प्रवेशित झालो. पुढे सेट-नेट, पीएचडी करून सहायक प्राध्यापक होण्याचे ध्येय आहे.
>
> **-सोहम जगताप**

इंजिनिअरिंगमध्ये करिअर करावे, असे कुटुंबीयांचा आग्रह होता. तो मान्य करत त्याने इंजिनिअरिंगमधून डिप्लोमा, डिग्री पूर्ण केली. कुटुंबीयांची इच्छा पूर्ण केल्यानंतर त्याने नोकरी करत पहिल्यांदा बी. ए. मराठीला प्रवेश घेतला. त्याचे एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर त्याला समजले की, थेट एम. ए. अभ्यासक्रमाला प्रवेशित होता येते. त्यावर त्याने एम. ए. प्रवेश घेतला आणि थेट कुलपती सुवर्णपदकावर नाव कोरले.

## दीक्षान्त समारंभ उद्या; महेश बंडगर याला ‘राष्ट्रपती सुवर्णपदक’, सोहम जगताप याला ‘कुलपती सुवर्णपदक’

# यंदाही पदवीधर होण्यात मुलींची आघाडी

▸सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षान्त समारंभ केंद्रीय पद्धतीने बुधवारी (दि. २९) सकाळी पावणेबारा वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल रमेश बैस, तर भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) कानपूरचे माजी संचालक पद्मश्री डॉ. संजय धांडे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख उपस्थित असणार आहेत. यंदा ३३७८५ मुली (विद्यार्थिनी) पदवी स्वीकारणार असून, त्यांनी आपली आघाडी कायम राखली. त्यांचे प्रमाण मुलांच्या एक टक्क्याने अधिक आहे.

या वर्षी महाविद्यालय पातळीवर केवळ पदवी प्रमाणपत्रांचे वितरण



रमेश बैस



डॉ. संजय धांडे

केले जाईल. कोरोनानंतर पहिल्यांदाच ऑफलाईन स्वरूपात दीक्षान्त समारंभ होणार आहे. क्रीडा, बौद्धिक व कलाक्षेत्र, एनसीसी., एनएएसमध्ये आदर्श ठरल्याबद्दल सावे (ता. सांगोला) येथील महेश माणिक बंडगर याला ‘राष्ट्रपती सुवर्णपदक’, तर किल्लेमच्छिंद्रगड (ता. वाळवा) येथील सोहम तुकाराम जगताप याला कुलपती सुवर्णपदकाने गौरविण्यात येणार असल्याची माहिची कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. यंदा एकूण



६६,४५७ स्नातकांना पदवी प्रदान केली जाणार असून, त्यात ३३७८५ मुली, तर ३२६७२ मुले आहेत. प्रत्यक्ष उपस्थित राहून १६५९४ स्नातक पदवी घेतील. उर्वरित ४९८६३ जणांना पोस्टाने पदवी पाठविली जाणार असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. या समारंभात १६ स्नातकांना पारितोषिके, तर ४६ जणांना पीएच.डी. पदवी प्रदान केली जाईल. यंदा पदवी प्राप्त स्नातकांमध्ये विद्यार्थिनींचा टक्का वाढल्याचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, ‘एनएसएस’चे संचालक डॉ. तुकाराम चौगुले, डॉ. शिवाजी जाधव आदी उपस्थित होते.

### पेपरलेस ‘दीक्षान्त’

■ या वर्षीच्या दीक्षान्त समारंभात पदवी स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज, शुल्क ऑनलाईन स्वरूपात घेण्यात आले. ही प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस राबविली. पदवी प्रमाणपत्रात काही चुका असल्यास त्याबाबतची तक्रारही विद्यार्थ्यांना ऑनलाईन करता येणार असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

### यंदाचे विद्याशाखानिहाय पदवीधर

| | |
|---|---|
| ■ विज्ञान व तंत्रज्ञान | २७५५० |
| ■ वाणिज्य व व्यवस्थापन | २११५५ |
| ■ मानव्यविद्या | १५५३९ |
| ■ आंतरविद्याशाखीय | २२१३ |
| ■ पारितोषिक प्राप्त विद्यार्थी | १६० |
| ■ पीएच.डी. प्राप्त विद्यार्थी | ३०० |

### ग्रंथदिंडी, महोत्सव आज

■ दीक्षान्त समारंभानिमित्त उद्या (ता. २८) सकाळी आठला ग्रंथदिंडी-पालखी मिरवणूक कमला कॉलेज ते विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृह या मार्गावर काढण्यात येईल. ग्रंथमहोत्सवाचे उद्‌घाटन सकाळी १० वाजता कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते होईल. बुधवारी (ता. २९) दुपारी साडेतीन वाजता संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे ‘जागर दुर्मिळ वाद्यांचा व भावतरंग’ सांस्कृतिक कार्यक्रम होणार असल्याचे ग्रंथमहोत्सवाचे समन्वयक डॉ. डी. बी. सुतार यांनी सांगितले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठातील ९२ जण जागतिक संशोधकांच्या क्रमवारीत

## ए. डी. सायंटिफिक इंडेक्स जाहीर; कुलगुरूंचाही समावेश

कोल्हापूर, ता. २७ : जागतिक पातळीवरील संशोधकांची क्रमवारी 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२३' जाहीर झाली आहे. त्यात शिवाजी विद्यापीठातील कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह एकूण ९२ वैज्ञानिक, संशोधक आहेत.



डॉ. दिगंबर शिर्के



डॉ. प्रमोद पाटील

अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठामार्फत हा निर्देशांक सन २०२१ पासून दरवर्षी जाहीर करण्यात येत आहे. पहिल्या वर्षीपासून शिवाजी विद्यापीठातील संशोधकांनी यादीमध्ये स्थान प्राप्त केले आहे. २०२१ मध्ये ४८, २०२२ मध्ये ८० आणि आता ९२ अशी संख्या वाढत राहिली आहे. या वर्षीच्या यादीचे वैशिष्ट्य म्हणजे यंदा

पान ११ वर >

# शिवाजी विद्यापीठातील ९२ जण जागतिक संशोधकांच्या क्रमवारीत

> पान १ वरून

कला, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे या विद्याशाखांकडील आठ जण ८ संशोधकांना स्थान प्राप्त झाले आहे. या संशोधकांत स्थान प्राप्त करणारे कुलगुरू डॉ. शिर्के संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक ठरले आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी मटेरियल सायन्स, सौरघट, इलेक्ट्रोमॅग्नेटिझम, गॅस सेन्सर आणि नॅनोविज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान कायम राखले आहे.

> शिवाजी विद्यापीठात विविध विषयांत अखंडित संशोधन सुरू असून, त्याचे हे फलित आहे. 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स'मध्ये संशोधकांची संख्या वर्षागणिक वाढत आहे, ही अतिशय समाधानाची बाब आहे.
>
> **-डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू

### या क्रमवारीतील अन्य संशोधक

डॉ. एस. पी. गोविंदवार, के. वाय. राजपुरे, सी. एच. भोसले, अण्णासाहेब मोहोळकर, ज्योती जाधव, के. एम. गरडकर, संजय कोळेकर, अनिल घुले, एस. डी. डेळेकर, एन. आर. तरवाळ, गोविंद कोळेकर, तुकाराम डोंगळे, राजेंद्र सोनकवडे, एस. आर. सावंत, विजय पुरी, डी. एम. पोरे, प्रमोद वासंबेकर, राजश्री साळुंखे, मधुकर देशमुख, जॉन डिसोजा, गजानन राशिनकर, कैलास सोनवणे, टी. जी. शिंदे. मानसिंग टाकळे, दिलीप एच. दगडे, एस. बी. सादळे, पी. डी. राऊत, संतोष नायघन, अशोक गडकरी, ए. के. साहू, राहुल रणवीर, के. डी. कुचे, निखिल गायकवाड, एम. व्ही. शांताकुमार, पी. बी. दांडगे, दत्तात्रय गायकवाड, किरण कुमार शर्मा, निरज राणे, पंकज के. पवार, टी. व्ही. साठे, एन. आर. प्रसाद, अनंत दोड्डमणी, नीलम डिगे, जमिल अहमद एस. मुल्ला, एस. जी. घाणे, उत्कर्ष मोरे, एन. एस. चव्हाण, एस. एस. कांबळे, निरंजना चव्हाण, सतीश एम. पाटील, सोनल चोंडे, विजय कोरे, सुहास कदम, आर. व्ही. गुरव, संभाजी शिंदे, क्रांतिवीर व्ही. मोरे, चेतन अवरे, एस. आर. यनकंची, आसिफ तांबोळी, व्ही. ए. सावंत, एम. एम. डोंगरे, कबीर खराडे, शशिभूषण बी. महाडिक, सचिन पन्हाळकर, सुरेश सूर्यवंशी, प्रयोगराज फंडीलोलू, जगदीश बी. संपकाळ, जयंत पाताडे, एम. पी. भिलावे, हेमांगी व्ही. कुलकर्णी, कविता एस. ओझा, एस. एम. गायकवाड, नितीन कांबळे, मिलिंद सुतार, ए. ए. देशमुख, एम. व्ही. वाळवेकर, शिवाजी एन. तायडे, यु. आय. बोंबले, इरात्रा उडचण, मेघा नानिवडेकर, सत्यजित एस. पाटील, प्रमोद कसबे, सागर टी. सुतार, एम. एस. देशमुख, मेघा देसाई, तृप्ती करेकट्टी, पी. एस. कांबळे, तेजस पाटील, विनायक गावडे, केदार व्ही. मारुलकर.

तरुण भारत

# विद्यापीठाची आज ग्रंथदिंडी, ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर मंगळवार २८ रोजी सकाळी ८ वाजता ग्रंथदिंडीचे आयोजन केले आहे. कमला कॉलेजमध्ये ग्रंथदिंडीचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. कमला कॉलेज, जनता बझार, राजारामपुरी मेन रोड, आईचा पुतळा, सायबर चौक, शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात ग्रंथदिंडीची सांगता होणार आहे. तर सकाळी १० वाजता ग्रंथमहोत्सवाच्या स्टॉलचे उद्घाटन होणार आहे. या ग्रंथमहोत्सवात पुस्तके व खाद्यपदार्थांच्या ५० स्टॉलचा समावेश आहे. ग्रंथमहोत्सवातील स्टॉल सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत सर्वांसाठी २९ मार्चपर्यंत खुले राहणार आहेत, अशी माहिती बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे समन्वयक डॉ. डी. बी. सुतार यांनी दिली.

तरुण भारत

# कोल्हापूर कॉलेज ऑफ फार्मसी विभागीय फार्मा करंडकाचा विजेता

■ केशवराव भोसले नाट्यगृहात बक्षीस वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर


शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील फार्मसी महाविद्यालयांसाठी केशवराव भोसले नाट्यगृहात नुकत्याच झालेल्या विभागीय सांस्कृतिक फार्मा करंडक स्पर्धेत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीने सांघिक विजेतेपद तर कळे येथील आनंदी फार्मसी कॉलेजने उपविजेतेपद मिळवले.

फार्मा करंडक स्पर्धेचे उद्‌घाटन मंगळवारी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. एच. एन. मोरे, डॉ. एस. जी. किल्लेदार, प्रा. आर. पी. ढवळे यांच्या उपस्थितीत नटराज पूजन केले. स्पर्धेत नृत्यनाटिका, नृत्य, लघुनाटिका, मुकनाट्य, गायन, वादन, चित्रकला, रांगोळी, फ्लावर ॲरेजमेंट कोलाज, पोस्टर पेटींग आदी प्रकारांचा समावेश होता. १४ महाविद्यालयांतील ६०० हून अधिक विद्यार्थी यात सहभागी झाले. परीक्षक म्हणून इरफान मुजावर, अशांत मोरे, राजेंद्र संकपाळ, ऋषिकेश देशमाने यांनी कामा पाहिले. कलाकार स्वप्नील राजशेखर यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. स्पर्धेत कोल्हापूर कॉलेज ऑफ फार्मसी प्रथम आनंदी फार्मसी कॉलेज कळे यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. उत्कृष्ट अभिनेता म्हणून कळेच्या जतीन सासने, अभिनेत्री कोल्हापूरची अपुर्वा साळुंखे, सोलोनृत्यात वारणानगरची स्नेहल दरेकर, गायक म्हणून वारणानगरच्या श्रेया रणभिसेला तर उत्कृष्ट सांघिक नृत्य म्हणून कळे फार्मसी कॉलेजला गौरवले.

तरुण भारत

# डॉ. टी. एम. चौगले यांची निवड

मुरगूड : मुरगूडचे सुपुत्र आणि भोगावती महाविद्यालय



कुरुकलीच्या प्राणीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. तानाजी महादेव चौगले यांची शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या संचालकपदी निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी तीन वर्षाच्या कालावधीसाठी ही ज़बाबदारी डॉ. चौगले यांच्याकडे सोपविली आहे. प्रा. डॉ. चौगले यांच्या निवडीने प्रथमच मुरगूडचा विद्यापीठ पातळीवर सन्मान झाला आहे. अध्यापनाचा २३ वर्ष अनुभव असणाऱ्या डॉ. चौगले यांची शैक्षणिक व संशोधनात्मक गुणवत्ता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक शोधनिबंधातून सिद्ध झाली आहे. विद्यापीठ पातळीवर त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. गेली चार वर्षे ते राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कार्यरत आहेत. संघटनात्मक कार्याची, अनुभवाची आणि सामाजिक क्षेत्रातील कामाची दखल घेऊन डॉ. शिर्के यांनी ही जबाबदारी सोपविली आहे.

# महेशला राष्ट्रपती, सोहमला कुलपती सुवर्णपदक

## राज्यपाल रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली उद्या सकाळी दीक्षांत समारंभ : शिवाजी विद्यापीठ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ उद्या बुधवार दि. २९ रोजी सकाळी ११.४५ वाजता राज्यपाल रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. कानपूर भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे (आयआयटी) माजी संचालक डॉ. संजय धांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राजमाता जिजाऊ सभागृहात होणाऱ्या दीक्षांत सोहळ्यात प्रत्यक्ष आणि पोस्टाने ६६ हजार ४५७ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान केली जाणार आहेत. तसेच यंदा राष्ट्रपती



सुवर्णपदकाचे मानकरी महेश बंडगर तर कुलपती सुवर्णपदकाचे मानकरी सोहम जगताप ठरले आहेत, अशी माहिती आयोजित पत्रकार परिषदेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात १६ हजार ५९४ विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष तर ४९ हजार ८६३ विद्यार्थ्यांना पोस्टाने एकूण ६६ हजार ४५७ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र दिली जाणार आहेत. पीएच. डी. पदवी ३०० स्नातकांपैकी ४६ स्नातकांना प्रत्यक्ष प्रदान केली जाईल. तसेच प्रत्येक विभागाच्या गुणवंत विद्यार्थ्यांनाही पारितोषिक देऊन गौरवण्यात येईल. यंदा ३३ हजार ७८५ मुली तर ३२ हजार ६७२ मुल पदवी घेणार आहेत. दीक्षांत समारंभाला प्रमुख पाहुणे कानपूर आयआयटीचे माजी संचालक डॉ. संजय धांडे उपस्थित



रमेश बैस



डॉ. संजय धांडे

राहतील. त्यांचा जन्म १४ फेब्रुवारी १९४८ साली झाला. सीओईपी पुणे येथून त्यांनी अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी कानपूर आयआयटीमध्ये पीएच. डी. पदवी घेतली. यूएसएमध्ये संगणक अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर भारतात परतले. शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान आहे. रॅपिड प्रोटोटाइपिंग, थ्रीडी प्रिंटिंग यासारख्या तंत्रज्ञानाची ओळख त्यांनी करून दिली. सक्षम प्रशासक, सरकारी सल्लागार संस्थांचे अध्यक्ष, भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण, राष्ट्रीय उत्पादन स्पर्धात्मक परिषद आणि नॅशनल इनोव्हेशन कौन्सिलच्या वैज्ञानिक सल्लागार समितीचे सदस्य, सध्या ते सिंगापूर सरकारच्या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सल्लागार समितीचे सल्लागार आहेत. संगणक तंत्रज्ञानात त्यांचे मोलाचे योगदान आहे. डॉ. धांडे दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित मार्गदर्शन करणार आहेत.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. अलोक जत्राटकर, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, एनएसएस संचालक डॉ. तानाजी चौगुले, परीक्षा विभागातील उपकुलसचिव आदी उपस्थित होते.

### पदवीप्राप्त विद्यार्थी

सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी : २७५५०, कॉमर्स अँन्ड मॅनेजमेंट : २११५५, ह्युमॅनिटीज : १५५३९, इंटर डिसीप्लीनरी स्टुडंट : २२१३, एकूण : ६६४५७



### फॉरेस्ट ऑफिसर बनणार

शैक्षणिक वर्षातील क्रीडा, बौध्दिक व कला क्षेत्र, एन. सी. सी., एन. एस. एस.मधील गुणवत्ता तसेच व्यक्तिमत्व, शारिरीक आरोग्य, भाषा शुध्दता, सर्वसाधारण ज्ञान, नेतृत्व गुण यामध्ये आदर्श ठरल्याबद्दल राष्ट्रपती सुवर्णपदक मिळाले. सोलापूर जिल्ह्यातील, सांगोला तालुक्यातील सावे गावचा रहिवासी असून, तिथेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतले. त्यानंतर सातारा येथे पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले आहे. सध्या शिवाजी विद्यापीठात प्राणीशास्त्र विभागात शिक्षण घेत असून अनेक रेस्क्यू ऑपरेशन यशस्वीपणे करतो. मी पहिल्यापासून पर्यावरणप्रेमी असून, माझे राष्ट्रीय पातळीवर दोन संशोधन पेपर प्रसिध्द झाले आहेत. भविष्यात अ वर्गातील फॉरेस्ट ऑफिसर बनण्याचे माझे स्वप्न आहे.

**महेश बंडगर (राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता)**



### प्राध्यापक होण्याचा मानस

मार्च २०२२ मध्ये एम. ए. परीक्षांमध्ये मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दल कुलपती सुवर्णपदक प्राप्त झाले आहे. मी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील इस्लामपूर- किल्ले मच्छिंद्रगड रहिवासी असून येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचा विद्यार्थी आहे. इंजिनिअरिंग डिप्लोमा पूर्ण करून, मराठी विषयात पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण घेतले. पहिल्यापासून मराठीची आवड असल्याने चांगले यश मिळवू शकलो. भविष्यात नेट-सेट आणि पीएच. डी. करून प्राध्यापक होण्याचा मानस आहे. सध्या इलेक्ट्रीकल इंजिनिअर म्हणून एका खासगी कंपनीत कार्यरत आहे.

**सोहम जगताप (कुलपती सुवर्णपदक विजेते)**

The Times of India

# SUK convocation: 66k students to get degrees

File Photo



The convocation was postponed after the governor of the state changed

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: The 59th convocation of Shivaji University would be held on Wednesday and preparations are being carried in full swing on the university premises.

In a press conference held on Monday, SUK Vice-chancellor Dr Digambar Shirke said that zoology student Mahesh Bandgar will be awarded the President's Medal while the Chancellor's Medal will be awarded to Soham Jagtap, who scored the highest marks in MA Marathi.

"The university has constituted 42 different committees for the convocation ceremony and a total of 66,457 people will be awarded their degree certificates. Of these, 16,594 students will be awarded the degree directly and 49,863 students by postal service. Apart from this, 300 people have completed their Ph.D., out of which 46 will be conferred with the title by the chief guest in the ceremony," Dr. Shirke added.

Earlier, the ceremony was to be held on February 16. However, the function was postponed due to the strike of non-teaching staff and due to the sudden resignation of former Maharashtra governor Bhagat Singh Koshyari.

Now, Governor Ramesh Bais has approved the invitation for March 29 and former director of IIT-Kanpur, Padmashree awardee Sanjay Dhande, will be the chief guest.

In February, the Uddhav Thackeray faction of the Shiv Sena had protested against the former governor's proposed visit to the univeristy over his controversial remarks on Chhatrapati Shivaji Maharaj.

The leaders of the party had also organised a 'Jail Bharo' protest in front of the main gate against Koshiyari's proposed visit to the campus.